Code No : 07 Model Question Paper PUC Second Year – 2022

Total No. of नमुना प्रश्नपत्रिका द्वितीय पी. यु. सी - 2022

Question : 06 Sub – Marathi ( 07) Time : 3 Hours 15 min.

विषय – मराठी ( ०७ ) Marks : 100

**सूचना :**

1) हस्ताक्षर स्वच्छ व सुबक असावे .
2) उजवीकडील अंक गुण दर्शवितात .
3) व्याकरणाचे सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक .

**प्रश्न I. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर निबंध लिहा.** **1X10=10**

१) पर्यावरण संवर्धन
२) वाचन संस्कृती
३) आमच्या गावची जत्रा.

**प्रश्न II . अ खालीलपैकी कोणत्याही पाच प्रश्नांची एक ते दोन वाक्यात उत्तरे लिहा.** **5 x1 =05**

४) म्हातारीने मुलाबद्दल गोसाव्यापुढे कोणते दु:ख व्यक्त केले ?
५) सैनिकांनी साहित्य खरेदी करणेस कोठे जावे असे सांगितले आहे ?
६) शाहू महाराजांनी स्त्री शिक्षणाधिकारी म्हणून कोणाची नियुक्ती केली ?
७) दादा केळुसकरांनी डॉ. आंबेडकराना कोणते पुस्तक बक्षिस म्हणून दिले होते?
८) देवाकडे काहीही मागू नये असे कोणी म्हटले आहे ?
९) गं. बा. सरदार यांच्या प्रज्ञेची दोन विश्रांती स्थाने कोणती आहेत ?
१०) कावेरीने कोणाला धीर दिला होता ?

**ब. खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नांचे सविस्तर उत्तर लिहा.** **1 x 6=06**

११) वीरराणी कित्तूर चन्नम्माने कलेक्टर थॅाकरे यांच्याशी केलेल्या लढाईचे वर्णन करा .
१२) डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या तीन आराध्य दैवतांविषयी माहिती लिहा ?
१३) सईचे व्यक्तिचित्रण तुमच्या शब्दात लिहा.

**क. खालीलपैकी कोणत्याही दोहोंचे संदर्भासह स्पष्टीकरण करा.** **2 x 3=06**

१४) “आ वों ! आ वो !” राउळी लेंकरूवासि जतन केली असे.”
१५) “ म्हणजे पुनर्जन्म नाही म्हणतेस की काय ?”
१६) “ मी चोरी केली असं खरच तुला वाटतं ?”
१७) “ नोकरीसाठी मिन्नतवारी करावी हे माझ्या स्वभावात नव्हतं”

**क. खालीलपैकी कोणत्याही दोहोवर टीपा लिहा.** **2 x 4 =08**

१८) शिवाजी महाराजांनी लष्कराला कोण-कोणत्या सूचना सांगितल्या आहेत ?
१९) शाहू महाराजांनी प्राथमिक शिक्षणासंबंधी केलेले कार्य लिहा .
२०) गं. बा. सरदार यांचे अस्पृश्यता व दलित साहित्य या विषयीचे विचार लिहा.
२१) अप्पासाहेब बेलवलकरांचा स्वभाव लिहा.

**प्रश्न III . अ खालीलपैकी कोणत्याही पाच प्रश्नांची एक ते दोन वाक्यात उत्तरे लिहा. 5 x1 =05**

२२) शिवालय कोण बांधतात ?

२३) संसारिक माणूस कोणत्या मोहात गुंतला आहे ?

२४) विठ्ठलाच्या नामस्मरणाने कशाचे पर्वत जळतील ?

२५) हंस पक्षी कोणाच्या हातात सापडतो ?

२६) बोरवनाची सुकलेली पाने कशाने टवटवीत झाली आहे ?

२७) सखी घरी येताना कशाचं मनं घेऊन आली होती ?

२८) राम-सीतेची उपमा कोणाला दिली आहे ?

**ब. खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नांचे सविस्तर उत्तर लिहा. 1 x 6=06**

२९) " पसायदान "या ओव्यांचा भावार्थ तुमच्या शब्दात लिहा ?

३०) " सत्वर पाव गे मला " या भारूडातील रुपकांच्या आधारे आध्यात्म विचार लिहा.

३१) 'आई' कवितेतील विविध उपमांच्या आधारे आईचे महत्व स्पष्ट करा.

**क. खालीलपैकी कोणत्याही दोहोंचे संदर्भासह स्पष्टीकरण करा. 2 x 3=06**

३२) 'हीच अंतरंग शुध्दी, हीच बहिरंग शुध्दी
हीच आमच्या कूडलसंगमदेवास प्रसंन्न करण्याची रीत'---

३३) 'किती हे सुख मानिती संसाराचे । काय हे साचे मृगजळ ॥
अभ्रीची छाया काय साच खरी । तैसेची हे परी संसाराची' ॥

३४) 'समोर इकडे तिकडे भवती । हलू लागली हिरवी नवती ,
ओलसरीने पाने दंवती, माळावरल्या वनराणीला नजराच सुढाळ'.

३५) "वाटलं, जातीयतेचा तू कंठच छेदला आहेस,
माणसालादुभंगणा-या द-या तू जोडीत आली आहेस."

**ड. खालीलपैकी कोणत्याही दोहोवर टीपा लिहा. 2 x 4=08**

३६) "निष्ठा" या कवितेतील खंत लिहा.

३७) "गोफ" या कवितेचा भावार्थ लिहा.

३८) हंसपक्षी व नलराजा यांच्यतील संवाद लिहा.

३९) "जीव माझा गुंतलाय" या कवितेतील बाळीचे वर्णन करा.

**प्रश्न IV. खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची सविस्तर उत्तर लिहा. 2 x 5=10**

४०) बाबलचा स्वभाव तुमच्या शब्दात लिहा.

४१) गावातील पोरांनी बाबलला का मारले ? त्याची अवस्था कशी झाली ?

४२) विलासकाकांना आईची आठवण का झाली ? आईने काय सांगितले होते ?

४३) पंडिताला कोण-कोणत्या वाईट सवयी लागल्या होत्या ? त्याचा काय परिणाम झाला ?

**प्रश्न V अ खाली दिलेल्या विषयावर अर्ज लिहा.( कोणताही एक ) 1 x 5=05**

४४) संत तुकाराम पदवीपूर्व महाविद्यालय धारवाड, या संस्थेत मराठी विषयाच्या शिक्षक पदासाठी प्राचार्यांच्या नावाने आवेदन पत्र लिहा.

४५) तुमच्या गावातील कचरा कुंडीतील कच-याची उचल केली नाही , त्या संदर्भात ग्रामपंचायत अध्यक्षांना तक्रार अर्ज करा.

**ब. अधोरेखीत शब्दांच्या विभक्ती ओळखा. 5 x1=05**

४६) **राम** शाळेला जात आहे.

४७) महेश **गावाहून** कालच घरी आला.

४८) **गावाचा** विकास लोकांच्याच हाती आहे.

४९) **<u>बागेत</u>** फुले भरपूर आहेत.

५०) **<u>मुलांनो !</u>** आरोग्याची काळजी घ्या.

**क. खालील वाकप्रचारांच्या योग्य जोड्या जुळवा.** **5 x1=05**

| अ | ब |
|---|---|
| ५१) हातपाय गाळणे | संबंध तोडणे |
| ५२) श्रीगणेशा करणे | धीर सोडणे. |
| ५३) काडीमोड करणे | सर्व व्यवस्थित होणे. |
| ५४) बेगमी करणे | प्रारंभ करणे |
| ५५) बैजवार होणे | साठा करणे |

**ड. खालील कंसात दिलेले योग्य शब्द जोडून म्हणी पूर्ण करा.** **5 x1= 05**

५६) आपलेच दात .........

५७) आंधळे दळते ..........

५८) कामापुरता ......

५९) खाण तशी .....

६०) चोरावर ........

( कुत्रे पीठ खाते , मामा, आपलेच ओठ, मोर, माती,)

**इ) खालील अ गटातील शब्द समुहाला ब गटातील योग्य शब्द निवडुन जोड्या जुळवा.** **5 x1=05**

| अ | ब |
|---|---|
| ६१) उंचावरून पडणारा पाणलोट | कवयित्री |
| ६२) थोडक्यात समाधान मनणारा | तिठा |
| ६३) देव आहे असे मानणारा | अल्पसंतुष्ट |
| ६४) कवितेची रचना करणारी | आस्तिक |
| ६५) तीन रस्ते एकवटातात ती जागा | धबधबा. |

**प्रश्न V वा उतारा वाचून खालील प्रश्नांची उत्तरे द्या** **5 x1=05**

अगदी पहिल्याप्रथम परमेश्वराची मूर्ती म्हणजे आई ! 'मातृदेवो भव' ! जन्मताच मुलाला आईशिवाय दुसरे कोण दिसते ? वत्सलतेच्या रुपाने ती परमेश्वराचीच मूर्ती तेथे उभी असते . ह्या मातेची व्याप्ती आपण वाढवू व "वंदे मातरम" म्हणून राष्ट्रमातेची व पुढे भूमातेची, पृथ्वीची पूजा करू. परंतु आरंभी उंच उंच अशी परमेश्वराची पहिली प्रतिमा जी मुलासमोर उभी राहिली ती मातेची. आईच्या पूजेने मोक्ष मिळणे अशक्य नाही. आईची पूजा म्हणजे वत्सलतेने उभ्या राहिलेल्या परमेश्वराची पूजा. म्हातारपणी आपल्या उपयोगी पडेल असा हिशोब करुन का ती आपल्या मुलाची सेवा करत असते ? छे छे ! तिने त्या मुलाला जन्म दिला . तिला वेदना झाल्या . त्या वेदना तिला त्या मुलाचे वेड लावतात . त्या वेदना तिला वत्सल करतात. तिला प्रेम केल्याशिवाय राहवतच नाही. ती माऊली म्हणजे निस्सीम प्रेमाची मूर्ती . उत्कृष्टातील उत्कृष्ट परमेश्वराची पूजा म्हणजे ही मातृपूजा आहे. ईश्वराला आई याच नावाने हाक मारायची. आई ह्या शब्दाहून आणखी उच्च शब्द कोठे ? आई हे पहिले ठळक अक्षर . तेथे ईश्वर पाहावयास शिका .

६६) परमेश्वाची उपमा कोणाला दिली ?

६७) मातेची व्याप्ती कशी वाढविली पाहिजे ?

६८) आईच्या पूजनाने काय प्राप्त होऊ शकते ?

६९) माऊली म्हणजे काय ?

७०) ईश्वर कोठे पाहिला पाहिजे ?

**साहित्य मंथन भाग -२** PUC Second Year

**SUBJECT : MARATHI (07)** BLUE PRINT OF QUESTION PAPER

**विषय : मराठी(०७)** **(नील नकाशा )** **MAXIMUM MARKS : 100**

| Sl. no | | ज्ञान | | | आकलन | | | उपयोजन | | | कौशल्य | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | वस्तुनिष्ठ . प्रश्न | लघु. प्रश्न | दीर्घो. प्रश्न | वस्तु प्रश्न | लघु . प्रश्न | दीर्घो. प्रश्न | वस्तु प्रश्न | लघु. प्रश्न | दीर्घो. प्रश्न | वस्तु प्रश्न | लघु. प्रश्न | दीर्घो. प्रश्न | एकूण गुण |
| 1 | श्री गोविंदप्रभूंच्या लिळा | १ | ३ | | | | | | | | | | | |
| 2 | मराठियाची तो इज्जत वाचणार नाही. | १ | | | | ४ | | | | | | | | |
| 3 | विरराणी कित्तुर चन्नम्मा | | | | | | ६ | | | | | | | |
| 4 | शिक्षण हाच आमचा तरणोपाय | १ | | | | (४) | | | | | | | | |
| 5 | माझं आयुष्य | १ | | | | | (६) | | | | | | | |
| 7 | सतीचे शस्त्र | | | | | | (६) | | | | | | | |
| ९ | आजीचे भाष्य | १ | (३) | | | | | | | | | | | |
| १० | हृदयसंवाद | १ | (३) | | | (४) | | | | | | | | |
| ११ | जीवनाची साय़ंकाळ | १ | ३ | | | ४ | | | | | | | | |
| | सोडवावयचे /दिलेले | ५/ ७ | ६/ १२ | | | ८/ १६ | ६/ १८ | | | | | | | २५/ ५३ |
| 1 | पसायदान | | | | | | ६ | | | | | | | |
| 2 | बसवेश्वरांचे वचनामृत | १ | ३ | | | | | | | | | | | |
| 3 | संत वाणी | | | | | | | | | | | | | |
| | अ)किती हे सुख मानिती संसाराचे | १ | (३) | | | | | | | | | | | |
| | ब) घेता नाम विठोबाचे | १ | | | | | | | | | | | | |
| | क) सत्वर पाव गे मला | | | | | | (६) | | | | | | | |
| 4 | तू थोर दया सिंधु | १ | | | | ४ | | | | | | | | |
| 5 | सुंदर हिरवे माळ | १ | (३) | | | | | | | | | | | |
| 6 | गोफ | | | | | (४) | | | | | | | | |
| ९ | आई | | | | | | (६) | | | | | | | |
| १० | सखी | १ | ३ | | | | | | | | | | | |
| ११ | निष्ठा | | | | | ४ | | | | | | | | |
| १२ | जीव माझा गुतलाय | १ | | | | (४) | | | | | | | | |
| | सोडवावयचे /दिलेले | ५/७ | ६/१२ | | | ८/१६ | ६/१८ | | | | | | | २५/ ५३ |
| 1 | पाझर | | | | | | ५(५) | | | | | | | |
| ३ | गळफास | | | | | | ५(५) | | | | | | | |
| | सोडवावयचे /दिलेले | | | | | | १०/२० | | | | | | | १०/ २० |
| 1 | निबंध | | | | | | | | | | | | १० (१०) (१०) | |
| 2 | विभक्ती | ११११ | | | | | | | | | | | | |
| 3 | अर्ज लेखन | | | | | | | | | | | | ५(५) | |
| 4 | वाकप्रचार | | | | | | | ११११ | | | | | | |
| 5 | समुदायदर्शक शब्द | | | | | | | ११११ | | | | | | |
| 6 | म्हंणी | | | | | | | ११११ | | | | | | |
| 7 | उतारा(आकलन) | | | | ११११ | | | | | | | | | |
| | सोडवावयचे /दिलेले | ५/५ | | | ५/ ५ | | | १५ /१५ | | | | | १५ /४० | ४०/ ६५ |
| | | | | | | | | | | | | | | |

टीप : `( ) कंसातील गुण प्रश्नपत्रिकेतील असून ते पर्यायी आहेत

प्रश्नपत्रिकेतील मूळ गुण ; १००

प्रश्नपत्रिकेतील एकूण गुण : १९१

## उद्दिष्टानुसार गुणांची विभागणी

### १. उद्दिष्टानुसार :

| अ.नं. | **उद्दिष्ट** | शेकडा प्रमाण | प्रश्न पत्रिकेतील गुणांची विभागणी |
|---|---|---|---|
| ०१ | ज्ञान | ३५% | ३५ |
| ०२ | आकलन | ३५% | ३५ |
| ०३ | उपयोजन | १५% | १५ |
| ०४ | कौशल्य | १५% | १५ |
| | एकूण | १००% | १००% |

### १.प्रश्नपत्रिकेचे स्वरूप :

| अ.नं. | प्रश्नपत्रिकेचे स्वरूप | शेकडा प्रमाण | गुणांची विभागणी |
|---|---|---|---|
| ०१ | वस्तुनिष्ट | ३५% | ३५ |
| ०२ | लघुत्तरी | २८% | २८ |
| ०३ | दिर्घोत्तरी | ३७% | ३७ |
| | एकूण | १००% | १००% |

### २. काठिण्य आधरित प्रश्न :

| अ.नं. | प्रश्नांची काठिण्यता | शेकडा प्रमाण | विभागणी |
|---|---|---|---|
| ०१ | सोपे प्रश्न | ३०% | ३० |
| ०२ | मध्यम प्रश्न | ४०% | ४० |
| ०३ | कठिण प्रश्न | ३०% | ३० |
| | एकूण | १००% | १००% |